5. Notice of the 23rd AGM and the Annual Report for the Financial Year 2025-26 will be sent by electronic mode to those Members whose email IDs are registered with the Company / Depositories. A letter providing the web link for accessing the Annual Report will be sent to those who have not registered their email IDs with the Company / Depositories.
6. The Notice of the 23rd AGM and the Annual Report for the Financial Year 2025-26 will also be available on the website of the Company at www.jyotiglobalplast.com, on website of stock exchange i.e. NSE Limited at www.nseindia.com and on website of the company's Registrar and Transfer Agent (RTA) i.e. MUFG Intime India Private Limited ("MIIPL") at https://instavote.linkintime.co.in
7. Manner of Registering/updating Email-Id, PAN and Bank details:

a) Members holding shares in physical mode who have not registered, updated their email addresses, PAN and Bank account details with the company are requested to register / update the same by writing to the company with details of folio number and attaching a self-attested copy of PAN card at cs@jyotiglobalplast.com or to MIIPL at enotices@in.mpms.mufg.com.

b) Members holding shares in dematerialised mode who have not registered / updated their email address PAN and Bank account details with their Depository Participant, are requested to register/update their email address with the Depository Participants with whom they maintain their Demat accounts.

8. Members are requested to carefully read all the notes set out in the notice of the AGM to be dispatched and in particular, Instructions for joining the AGM, manner of casting vote through remote e-voting or through Insta MEET during the AGM.
9. Members may participate in the AGM even after exercising their right to vote through remote e-voting but shall not be allowed to vote again at the AGM.
10. In case of any query members may send an email to Company's RTA at instameet@in.mpms.mufg.com with marking CC to info@jyotiglobalplast.com and cs@jyotiglobalplast.com

For Jyoti Global Plast Limited
Mayur Kamtaprasad Dube
Company Secretary & Compliance Officer
ACS: A78980

Date: July 29, 2026
Place: Navi Mumbai

PUBLIC NOTICE

ALL PERSONS TO KNOW by this NOTICE given as per the information furnished by my client **1) MR. HARISH ANKUSH INGAWALE & 2) MISS. HARSHADA ANKUSH INGAVALE,** residing at Flat No. 409, 4th Floor, Shivanand Apartment, M.S. Road, Teen Hath Naka, Wagle Estate, Thane (West) - 400 604 as under:-

SCHEDULE OF PROPERTY
SCHEDULE "A"

All the piece and parcel of **Shop No. 14,** admeasuring **392.00 Sq. Ft. i.e. 36.42 Sq. Mtrs. Rera Carpet** area on **Ground Floor,** in the **"BHAIRAAV MILESTONE", along with One Mechanized Car Parking** Slot in the Basement / Compound of the building standing on the plot of land bearing **Plot No. C-15 of Village - Panchpakhadi,** lying, being and situated at Road No. 16, Wagle Industrial Area, Panchpakhadi, Thane - 400604, within the limits of Thane Municipal Corporation and within the Registration District and Sub-District of Thane.

SCHEDULE "B"

All the piece and parcel of **Flat / Apartment No. 902,** admeasuring **72.21 Sq. Mtrs. (Carpet)** area on **9th Floor**, in the **Tower C - 1 (known as IRIS - 1), Wing C1 of Tower C**, in the complex known as **KASHISH PARK, One Car Parking Space in stack at the basement / Mechanized Car Parking Tower No. B6-23 with access thereto from the Basement / Ground of Tower C** standing on the plot of land bearing **City Survey No. 2 to 21, 37, 38, 39 and 40 (Part) of Village – Naupada**, lying, being and situated L. B. S. Marg, Near Mulund Check Naka, Naupada, Thane West - 400604, within the limits of Thane Municipal Corporation and within the Registration District and Sub-District of Thane.

(The above schedule properties hereinafter referred as the said properties)

That my client's Father, late **MR. ANKUSH DNYANDEV INGAVALE** was the absolute and lawful owner and having 50% share in Schedule A & and having 33% share in Schedule B properties. **MR. ANKUSH DNYANDEV INGAVALE** died intestate on 02/05/2024 leaving behind **1) SMT.CHAYA ANKUSH INGAVALE (Wife), 2) MR. HARISH ANKUSH INGAWALE (Son), 3) MR.MANGESH ANKUSH INGAVALE (Son), 4) MISS. HARSHADA ANKUSH INGAVALE (Daughter)** as his only legal heirs and they have undivided share in the schedule A & B properties.

That Late **MR. ANKUSH DNYANDEV INGAVALE** did not execute any will, co docile or any testamentary document in respect of the said property or any part thereof in favour of any third party or person hereinbefore.

Now **1) SMT.CHAYA ANKUSH INGAVALE 3) MR.MANGESH ANKUSH INGAVALE, & 3) MISS. HARSHADA ANKUSH INGAVALE** willingly desires to release their respective Share, right, title and interest in respect of the schedule **A** property to **MR. HARISH ANKUSH INGAWALE** by executing a release deed for the schedule **A** property & register in the office of the Sub-Registrar, Thane.

And also **1) SMT.CHAYA ANKUSH INGAVALE, 2) MR. HARISH ANKUSH INGAWALE & 3) MR.MANGESH ANKUSH INGAVALE** willingly desires to release their respective Shares, right, title and interest in respect of the schedule **B** property to **MISS. HARSHADA ANKUSH INGAVALE (Daughter)** by executing a release deed for the schedule **B** property & register in the office of the Sub-Registrar, Thane.

That if any person, party, firm, bank or any financial institution have any right, title and interest by way of sale, gift, will, lease, mortgage, charge etc, in respect of the said premises or having any objection, claim and demand of whatsoever nature are requested to contact my client of their above given address personally OR at my office address with all relevant documentary evidence within **15** days from the date of publication of this notice, failing which my clients shall be entitled to complete the procedure of release deed in respect of the Schedule A & Schedule B properties and thereafter no any claim, demand and objection shall be entertained. Please note.

Place : Thane
Date: 29/7/2026 **Sd/-**
Adv. S.M. Shirsat
402, 4th Floor, Shree Adinath CHSL, **Adv. High court**
Kadva Lane, Court Naka, Thane (W) – 400601 **M. No. 8169646845**

पीएमपीचा अनावश्यक खर्चावर लगाम; स्पेअर पार्ट खरेदीला नवे नियम

बस बिघाडाचा २४ तासांत अहवाल बंधनकारक; खर्च बचतीसाठी मार्गांचे पुनर्नियोजन

पुणे, दि. २८ (वार्ताहर) : पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपीएमएल) आर्थिक शिस्त मजबूत करण्यासाठी महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. अनावश्यक स्पेअर पार्ट खरेदीवर नियंत्रण आणण्यात आले असून, बस बिघाड झाल्यानंतर संबंधित डेपोला २४ तासांच्या आत कारणमीमांसा अहवाल सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या अहवालाच्या आधारेच पुढील काळात स्पेअर पार्ट खरेदी केली जाणार आहे.

पीएमपीच्या ताफ्यातील बसच्या देखभाल-दुरुस्तीसाठी यापूर्वी गरज नसतानाही मोठ्या प्रमाणावर स्पेअर पार्टची खरेदी केली जात होती. त्यामुळे अनेक साहित्य गोदामांमध्ये पडून राहत होते आणि महामंडळावर अनावश्यक आर्थिक भार वाढत होता. आता नव्या निर्णयामुळे केवळ आवश्यकतेनुसारच साहित्य खरेदी केली जाणार असून, त्यातून खर्चात बचत होण्याची अपेक्षा प्रशासनाने व्यक्त केली आहे.

पीएमपीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक महेश आव्हाड यांनी सांगितले की, प्रत्येक खर्चावर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. बस बिघाडाचे नेमके कारण, आवश्यक दुरुस्ती आणि लागणाऱ्या साहित्याची माहिती अहवालाच्या माध्यमातून घेतली जाणार आहे. त्यानंतरच संबंधित स्पेअर पार्ट खरेदीला मंजुरी दिली जाईल. या प्रक्रियेमुळे आर्थिक नियोजन अधिक प्रभावी होण्यास मदत होणार आहे.

दरम्यान, कमी प्रवासी संख्या असलेल्या बसमार्गांचाही सविस्तर अभ्यास सुरू करण्यात आला आहे. या मार्गांवरील बसगाड्या अधिक प्रवासी असलेल्या मार्गांवर वळविण्याचा प्रशासनाचा विचार आहे. त्यामुळे बससेवेचा अधिक चांगला वापर होण्याबरोबरच उत्पन्न वाढण्याची शक्यता आहे. सध्या पीएमपीला तिकीट आणि पास विक्रीतून दरवर्षी सुमारे ७२० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते. हे उत्पन्न वाढवून ८०० कोटी रुपयांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

पीएमपी प्रशासनाने खर्च कपात आणि उत्पन्नवाढीसाठी विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. स्पेअर पार्ट खरेदीतील पारदर्शकता, बसमार्गांचे पुनर्नियोजन आणि प्रवाशांच्या गरजेनुसार सेवा सुधारणा या माध्यमातून महामंडळाची आर्थिक स्थिती मजबूत करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

दरम्यान, चाकण एमआयडीसी फेज-२ परिसरातील कामगार, विद्यार्थी आणि नागरिकांसाठी पीएमपीने नवीन बससेवा सुरू केली आहे. सार्वजनिक वाहतुकीच्या अपुऱ्या सुविधेमुळे अडचणींचा सामना करणाऱ्या हजारो नागरिकांना या सेवेमुळे दिलासा मिळणार आहे. खासगी वाहनांवरील अवलंबित्व कमी करून प्रवाशांना नियमित आणि परवडणारी वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्याचा उद्देश या उपक्रमामागे आहे.

उल्हासनगरमध्ये पाच मजली इमारतीचा भाग कोसळला

उल्हासनगर, दि. २८ (वार्ताहर) : उल्हासनगर कॅम्प-३ येथील छत्रपती शिवाजी चौक परिसरात सोमवारी साई सृष्टी या पाच मजली व्यावसायिक इमारतीचा मागील संपूर्ण भाग अचानक कोसळल्याने परिसरात खळबळ उडाली. सुदैवाने बाजार बंद असल्याने मोठा अनर्थ टळला असून, दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा दुखापत झाल्याची माहिती नाही.

इमारतीचा भाग कोसळल्याची माहिती मिळताच उल्हासनगर महानगरपालिकेचा अग्निशमन विभाग, पोलीस पथक आणि संबंधित अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. खबरदारीचा उपाय म्हणून इमारतीच्या परिसरातील नागरिकांना हटविण्यात आले तसेच रस्त्यावरील वाहतूक काही काळासाठी बंद करण्यात आली. अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी करून उर्वरित धोकादायक भाग हटविण्याची प्रक्रिया सुरू केली.

दुर्घटनाग्रस्त इमारतीचा उर्वरित भाग पाडण्यासाठी ५० फूट उंच हायड्रो कटरच्या सहाय्याने सोमवारी सायंकाळपासून काम सुरू करण्यात आले. संभाव्य धोका लक्षात घेऊन प्रशासनाकडून अत्यंत सावधगिरी बाळगण्यात येत आहे. परिसरातील वीजपुरवठाही सुरक्षेच्या कारणास्तव बंद करण्यात आला होता.

इमारत पाडण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर रात्री ९ वाजेपर्यंत वीजपुरवठा पूर्ववत करण्याचे आदेश महापौर अश्विनी निकम यांनी दिले आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिका

वृक्ष प्राधिकरण
- जाहिर सूचना-

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ (जानेवारी २०१८ सुधारलेला) कलम ८ (३) (क) मधील तरतूदी नुसार **परिमंडळ-०१** मधील 'डी' विभागातील ०१ प्रस्ताव **परिमंडळ -०२** मधील 'जी/उत्तर' विभागातील ०१ प्रस्ताव, म्हणजेच एकूण ०२ प्रस्ताव, म.न.पा. आयुक्त, अध्यक्ष वृक्ष प्राधीकरण / वृक्ष प्राधिकरण समिती यांचा मंजुरी प्राप्त झाले आहेत.

उपरोक्त प्रस्तांवामधील झाडे कापणे / पुनर्रोपित करणेबाबतचा तपशील हा म. न. पा. च्या www.mcgm.gov.in संकेतस्थळावर, बृहन्मुंबई महानगरपालिकेविषयी विभाग आणि खाते खातेनिहाय माहिती पुस्तिका उद्याने व वृक्ष प्राधिकरण कागदपत्रे या लिंक वर उपलब्ध आहे. ११२० (डी विभाग) ११२१ (जी/उत्तर)

उद्यान अधीक्षक यांचे कार्यालय,
पेंग्विन इमारत, २ रा माळा,
वीरमाता जिजाबाई भोसले उदयान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग,
भायखळा (पूर्व) मुंबई - 400027.
दुरध्वनी क्र. २३७४२१६२ Email - sg.gardens@mcgm.gov.in

स्वाक्षरी/-
उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी

PRO/940/ADV/2026-27

स्वमर्जीने औषधोपचार करु नका.

शेतकऱ्यांसाठी नवा पर्याय; निर्जल अमोनिया खताला केंद्राची मंजुरी

नवी दिल्ली, दि. २८ (वृत्तसंस्था) : देशातील शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या युरिया खताच्या तुटवड्यावर उपाय म्हणून केंद्र सरकारने ८२ टक्के नायट्रोजन असलेल्या निर्जल अमोनिया खताच्या वापरास मंजुरी दिली आहे. खत क्षेत्रात नवीन पर्याय उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने घेतलेल्या या निर्णयामुळे युरियावरील अवलंबित्व कमी होण्यास आणि खत आयातीवरील खर्च घटण्यास मदत होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

केंद्र सरकार खतांच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी सातत्याने विविध उपाययोजना करत आहे. याच धोरणाचा भाग म्हणून केंद्रीय कृषी मंत्रालयाने खत नियंत्रण आदेश, १९८५ अंतर्गत निर्जल अमोनिया खताच्या उत्पादनाला परवानगी दिली आहे. २३ जुलै रोजी जारी करण्यात आलेल्या अधिसूचनेनुसार, पात्र कारखान्यांना राजपत्र अधिसूचनेच्या तारखेपासून तीन वर्षांसाठी हे खत तयार करण्याची मुभा देण्यात आली आहे. या खतामध्ये वजनानुसार किमान ८२ टक्के नायट्रोजन असणे आवश्यक आहे. निर्जल अमोनियाच्या वापराला मान्यता देणारा भारत हा जगातील चौथा देश ठरणार आहे. यापूर्वी अमेरिका, कॅनडा आणि ऑस्ट्रेलिया या देशांमध्ये शेतीसाठी थेट अमोनियाचा वापर केला जातो. उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, भारतात ही पद्धत यशस्वी झाल्यास शेतकऱ्यांना नायट्रोजनयुक्त खतांचा आणखी एक पर्याय उपलब्ध होईल. तसेच देशांतर्गत खत उत्पादन क्षमतेचा अधिक प्रभावी वापर करता येणार आहे. युरिया आणि निर्जल अमोनिया हे दोन्ही नायट्रोजनचे स्रोत असले तरी त्यांच्या वापराच्या पद्धती वेगळ्या आहेत. युरिया सामान्यतः शेतांमध्ये थेट वापरला जातो, तर निर्जल अमोनिया वायू स्वरूपात असून जमिनीत विशेष उपकरणांच्या माध्यमातून सोडावा लागतो. यासाठी सुरक्षित साठवण व्यवस्था, वाहतूक सुविधा आणि विशेष यंत्रसामग्रीची आवश्यकता आहे. त्यामुळे या खताच्या व्यापक वापरासाठी पायाभूत सुविधा आणि सुरक्षा व्यवस्था उभारणे हे मोठे आव्हान राहणार आहे. देशात सध्या युरियाची मागणी मोठ्या प्रमाणावर आहे. पावसाळी हंगामात पिकांच्या वाढीसाठी शेतकऱ्यांकडून युरियाची मागणी वाढते.

स्मार्ट मीटरबाबत शंका दूर करण्यासाठी महावितरणचे मेळावे

कल्याण-डोंबिवलीतील ३०० हून अधिक ग्राहकांचा सहभाग; वीज बिल तक्रारींचे जागेवर निराकरण

कल्याण, दि. २८ (वार्ताहर) : स्मार्ट मीटरबाबत ग्राहकांमध्ये असलेल्या शंका आणि गैरसमज दूर करण्यासाठी महावितरणच्या कल्याण परिमंडळाने जनजागृती मोहीम सुरू केली आहे. वाढीव वीज बिलांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासोबतच ग्राहकांना स्मार्ट मीटरची कार्यपद्धती समजावून सांगण्यासाठी विविध ठिकाणी वीज ग्राहक मेळावे आणि देयक दुरुस्ती शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. कल्याण मंडळ कार्यालय-१ अंतर्गत कल्याण पश्चिम आणि डोंबिवली विभागात आयोजित करण्यात आलेल्या या विशेष शिबिरांना ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. दोन्ही ठिकाणी झालेल्या मेळाव्यांमध्ये ३०० पेक्षा अधिक वीज ग्राहक सहभागी झाले. डोंबिवली येथे सलग तीन दिवस आयोजित करण्यात आलेल्या उपक्रमात १६१ ग्राहकांनी सहभाग घेतला. यावेळी ग्राहकांनी वीज बिल, मीटर रीडिंग आणि स्मार्ट मीटरशी संबंधित विविध समस्या मांडल्या.

डोंबिवली पश्चिम येथील गणपती मंदिराच्या मागे, पी. डी. रोड येथे आयोजित मेळाव्यात ग्राहकांना वीज बिलातील त्रुटी, वाढीव देयक, मीटरमधील वीज वापराची नोंद, तांत्रिक अडचणी यांसह विविध विषयांवर थेट अधिकाऱ्यांशी संवाद साधण्याची संधी देण्यात आली. अनेक ग्राहकांच्या तक्रारींचे जागेवरच निराकरण करण्यात आले असून, काही प्रकरणांवर तातडीने कार्यवाही सुरू करण्यात आली.

मेळाव्यात स्मार्ट मीटरची कार्यपद्धती, अचूक वीज मोजणी, पारदर्शक बिलिंग प्रणाली, प्रत्यक्ष वेळेतील वीज वापराची माहिती आणि ऑनलाइन सुविधांबाबत ग्राहकांना सविस्तर माहिती देण्यात आली. स्मार्ट मीटरमुळे वीज वापरावर नियंत्रण ठेवणे आणि वीज बचतीसाठी नियोजन करणे शक्य असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. ग्राहकांच्या प्रश्नांना उत्तरे देत स्मार्ट मीटरबाबतचे गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

कल्याण पश्चिम विभागातील शिवाजी चौक शाखा-२ येथे झालेल्या शिबिरात १०० हून अधिक ग्राहक उपस्थित होते. या मेळाव्यात अनेक ग्राहकांनी स्मार्ट मीटर बसविण्यास सहमती दर्शविली. महावितरणच्या या उपक्रमामुळे ग्राहक आणि प्रशासन यांच्यातील संवाद वाढण्यास मदत होत असल्याचे सांगण्यात आले. या शिबिरांच्या आयोजनासाठी डोंबिवली विभागाचे कार्यकारी अभियंता अण्णासाहेब काळे, कल्याण पश्चिमचे कार्यकारी अभियंता राजेश काळे तसेच देयक व महसूल विभागातील अधिकारी सुनिल गौंड, श्रीकृष्ण देशपांडे, योगेश मराठे आणि महेंद्र वाकपैंजण यांनी विशेष प्रयत्न केले.

जाहीर नोटीस

प्रस्तावित रूपांतराची नोटीस
(कंपनी (स्थापना) नियम, २०१४ च्या नियम २२(२) अंतर्गत)

याद्वारे सर्वसामान्य जनता, धनको, सदस्य आणि सर्व संबंधितांना **नोटीस** देण्यात येते की, **डब्ल्यूएलसी डेव्हलपमेंट फाउंडेशन,** जी कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत स्थापन झालेली आणि त्यातील कलम ८ अंतर्गत परवानाप्राप्त कंपनी आहे, जिचे **नोंदणीकृत कार्यालय एफ-११०१, विंग एफ, रुस्तमजी एलिमेंट्स न्यू, डी. एन. नगर, अंधेरी, मुंबई, महाराष्ट्र-४०००५३** येथे आहे, आणि जिचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक **U88900MH2023NPL406963** आहे, तिने **२७ जुलै २०२६** रोजी आयोजित केलेल्या तिच्या विशेष सर्वसाधारण सभेत एक विशेष ठराव मंजूर केला आहे, ज्यामध्ये कंपनीचे कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ८ अंतर्गत परवानाप्राप्त कंपनीमधून 'प्रायव्हेट लिमिटेड कंपनी' मध्ये रूपांतर करण्याचा प्रस्ताव आहे.

प्रस्तावित नवीन नाव	डब्ल्यूएलसी डेव्हलपमेंट प्रायव्हेट लिमिटेड
रूपांतराचे कारण	कंपनी प्रायव्हेट लिमिटेड कंपनीमध्ये रूपांतरित होण्याचा प्रस्ताव देत आहे कारण आता तिचा व्यावसायिक उपक्रम राबविण्याचा आणि इक्विटी भांडवलासह गुंतवणूक उभारण्याचा हेतू आहे, जे कलम ८ च्या संरचनेअंतर्गत अनुज्ञेय नाही. कंपनीच्या कार्याची व्याप्ती वाढली असून व्यावसायिक करार आणि भागीदारी करण्यासाठी लवचिकतेची आवश्यकता आहे, जी कलम ८ च्या कंपन्यांना लागू असलेल्या निर्बंधांशी सुसंगत नाही. तसेच, तिचे प्रवर्तक आणि सदस्यांना परतावा वितरीत करण्यासाठी आणि कर्मचाऱ्यांना इक्विटी सहभागाद्वारे बक्षीस देण्यासाठी ही लवचिकता आवश्यक आहे. त्यामुळे, या प्रस्तावित रूपांतरणामुळे कंपनीला तिची दीर्घकालीन धोरणात्मक आणि व्यावसायिक उद्दिष्टे अधिक चांगल्या प्रकारे साध्य करणे शक्य होईल, जी सध्याच्या कलम ८ च्या संरचनेअंतर्गत पूर्णपणे साध्य होऊ शकत नाहीत.
विशेष ठरावाची तारीख	२७ जुलै २०२६
यांच्याकडे दाखल केले/दाखल केले जाणार	प्रादेशिक संचालक, पश्चिम क्षेत्र संचालनालय I

वरील प्रस्तावित रूपांतरास कोणत्याही व्यक्तीची (व्यक्तींची) हरकत असल्यास, त्यांनी आपली हरकत लेखी स्वरूपात **प्रादेशिक संचालक, पश्चिम क्षेत्र संचालनालय I, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय, एव्हरेस्ट, ५ वा मजला, १०० मरीन ड्राईव्ह, मुंबई-४००००२, महाराष्ट्र यांच्याकडे आणि कंपनीच्या एफ-११०१, विंग एफ, रुस्तमजी एलिमेंट्स न्यू, डी. एन. नगर, अंधेरी, मुंबई, महाराष्ट्र-४०००५३** या नोंदणीकृत पत्त्यावर आणि/किंवा accounts@wlc.org.in या ई-मेलवर ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून **२१ (एकवीस) दिवसांच्या** आत पाठवावी.

डब्ल्यूएलसी डेव्हलपमेंट फाउंडेशन करिता

राहुल ध्रुव
संचालक
डीआयएन : १००३३४१२
पत्ता: फ्लॅट क्र. ११०१, एफ विंग, रुस्तमजी एलिमेंट्स, न्यू डीएन नगर, अंधेरी वेस्ट, मुंबई ४०००५३, महाराष्ट्र, भारत

जया अनिल कुमार मेहरोत्रा
संचालक
डीआयएन: १००३३४१३
पत्ता: फ्लॅट क्र. ११०१, एफ विंग, रुस्तमजी एलिमेंट्स, न्यू डीएन नगर, अंधेरी वेस्ट, मुंबई - ४०००५३, महाराष्ट्र, भारत

ठिकाण: मुंबई
दिनांक: २९ जुलै २०२६

ज्योती ग्लोबल प्लास्ट लिमिटेड

कार्यालय: आर - ५५४/५५५, टी.टी.सी., एम.आय.डी.सी., गोल्डन गॅरेज जवळ, रबाळे, नवी मुंबई - ४००७०१, महाराष्ट्र, भारत.
मोबा. क्र. ८५९१५८५४९७ **ईमेल:** info@jyotiglobalplast.com
वेबसाईट: www.jyotiglobalplast.com
सीआयएन क्र.: L84220MH2004PLC143876

व्हीसी/ओएव्हीएमद्वारे आयोजित होणाऱ्या २३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तहकुबीची (पुढे ढकलल्याची) नोटीस

१. याद्वारे नोटीस देण्यात येते की, अनपेक्षित परिस्थितीमुळे कंपनीच्या सदस्यांची २३ वी (तेवीसावी) वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम*), जी मूळतः गुरुवार, ०६ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ०३:०० वाजता आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले होते, ती पुढे ढकलण्यात आली आहे.
२. एजीएमच्या नोटीसमध्ये नमूद केल्यानुसार कामकाज पार पाडण्यासाठी सदर एजीएम आता **शुक्रवार, २१ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ०३:०० वाजता** व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) / अन्य दृकश्राव्य माध्यमांद्वारे (ओएव्हीएम) आयोजित केली जाईल.
३. कंपनीने सेबी (एलओडीआर) नियमन, २०१५ च्या नियमन ३० अंतर्गत नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडला या तहकुबीची माहिती दिली आहे. खाली नमूद केलेल्या इतर सर्व सूचना, कार्यपद्धती आणि तपशील वार्षिक सर्वसाधारण सभेच्या मागील नोटीसमध्ये नमूद केल्याप्रमाणेच राहतील.
४. कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने त्यांच्या २२ सप्टेंबर २०२५ रोजीच्या सामान्य परिपत्रक क्र. ०३/२०२५ तसेच या संदर्भात पूर्वी जारी केलेली परिपत्रके (एकत्रितपणे एमसीए परिपत्रके* म्हणून संदर्भित) आणि ३ ऑक्टोबर २०२४ रोजीचे सेबी परिपत्रक क्र. SEBI/HO/CFD/CFD-POD2-/P/CIR/133/2024 (सेबी परिपत्रके*) याद्वारे सदस्यांच्या एका सामायिक ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय, व्हीसी/ओएव्हीएम द्वारे एजीएम आयोजित करण्यास परवानगी दिली आहे. या एमसीए परिपत्रकांचे आणि कंपनी कायदा, २०१३ च्या संबंधित तरतुदींचे पालन करून, कंपनीची २३ वी एजीएम व्हीसी/ओएव्हीएम द्वारे आयोजित केली जाईल.
५. २३ व्या एजीएमची नोटीस आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अहवाल केवळ अशा सदस्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठवला जाईल ज्यांचे ईमेल आयडी कंपनी / डिपॉझिटरीजकडे नोंदणीकृत आहेत. ज्यांनी आपले ईमेल आयडी कंपनी/डिपॉझिटरीजकडे नोंदणीकृत केलेले नाहीत त्यांना वार्षिक अहवालात प्रवेश करण्यासाठी वेब लिंक देणारे पत्र पाठवले जाईल.
६. २३ व्या एजीएमची नोटीस आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अहवाल कंपनीच्या www.jyotiglobalplast.com या वेबसाईटवर, स्टॉक एक्स्चेंज म्हणजेच एनएसई लिमिटेडच्या www.nseindia.com या वेबसाईटवर आणि कंपनीचे रजिस्ट्रार अँड ट्रान्सफर एजंट (आरटीए) म्हणजेच एमयूएफजी इंटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (एमआयआयपीएल*) च्या https://instavote.linkintime.co.in या वेबसाईटवर देखील उपलब्ध असेल.
७. ईमेल-आयडी, पॅन आणि बँक तपशील नोंदणीकृत/अद्ययावत करण्याची पद्धतः
अ) प्रत्यक्ष स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या ज्या सदस्यांनी त्यांचे ईमेल पत्ते, पॅन आणि बँक खात्याचे तपशील कंपनीकडे नोंदणीकृत किंवा अद्ययावत केलेले नाहीत, त्यांना विनंती करण्यात येते की त्यांनी cs@jyotiglobalplast.com वर कंपनीला किंवा enotices@in.mpms.mufg.com वर एमआयआयपीएलला फोलिओ क्रमांकाच्या तपशिलासह आणि पॅन कार्डची स्व-साक्षांकित प्रत जोडून सदर तपशील नोंदणीकृत/अद्ययावत करावेत.
ब) डिमटेरिअलाईझ्ड स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या ज्या सदस्यांनी त्यांचे ईमेल पत्ते, पॅन आणि बँक खात्याचे तपशील त्यांच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे नोंदणीकृत/अद्ययावत केलेले नाहीत, त्यांना विनंती करण्यात येते की त्यांनी ज्यांच्याकडे त्यांचे डिमॅट खाते आहे त्या डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे त्यांचा ईमेल पत्ता नोंदणीकृत/अद्ययावत करावा.
८. सदस्यांना विनंती करण्यात येते की त्यांनी पाठवल्या जाणाऱ्या एजीएमच्या नोटीसमध्ये नमूद केलेल्या सर्व टीपा आणि विशेषतः एजीएममध्ये सामील होण्याच्या सूचना, रिमोट ई-व्होटिंगद्वारे किंवा एजीएम दरम्यान इन्स्टा मीट द्वारे मतदान करण्याच्या पद्धती काळजीपूर्वक वाचाव्यात.
९. जे सदस्य रिमोट ई-व्होटिंगद्वारे आपला मतदानाचा हक्क बजावतील, ते देखील एजीएममध्ये सहभागी होऊ शकतील, परंतु त्यांना एजीएममध्ये पुन्हा मतदान करण्याची परवानगी दिली जाणार नाही.
१०. कोणत्याही शंकेच्या बाबतीत, सदस्य info@jyotiglobalplast.com आणि cs@jyotiglobalplast.com ला सीसी करून कंपनीच्या आरटीएला instameet@in.mpms.mufg.com वर ईमेल पाठवू शकतात.

ज्योती ग्लोबल प्लास्ट लिमिटेड करिता
(स्वाक्षरी)
मयूर कामताप्रसाद दुबे
कंपनी सेक्रेटरी आणि कम्प्लायन्स ऑफिसर
एसीएस: A78980

दिनांक: २९ जुलै २०२६
ठिकाण: नवी मुंबई

Muthoot Homefin — जाहीर नोटीस

मुथूट होमफिन (इंडिया) लिमिटेडच्या ग्राहकांसह सर्वसामान्य जनतेला याद्वारे सूचित करण्यात येते की, ग्राहकांच्या सोयीसाठी आमची खाली नमूद केलेली शाखा नवीन पत्त्यावर स्थलांतरित केली जाईल.
विद्यमान शाखेच्या सर्व ग्राहकांना आणि सर्वसामान्य जनतेला विनंती करण्यात येते की, त्यांनी खाली नमूद केलेल्या आमच्या नवीन पत्त्यावर व्यवहार / संपर्क साधावा.

अ. क्र.	शाखेचे नाव / राज्य	सध्याचा कार्यालयीन पत्ता	नवीन कार्यालयीन पत्ता	पत्ता बदलाच्या सूचनेची तारीख
१.	कल्याण / महाराष्ट्र	मुथूट होमफिन (आय) लि., बाबाजी भवन, १ला मजला, राजा हॉटेलच्या समोर, अहिल्याबाई चौक, कल्याण पश्चिम, महाराष्ट्र ४२१३०१.	क्र. ३०२, ३रा मजला, साई पार्कस्ट्रीट बिल्डिंग, पॅराडाईज हॉटेलजवळ, बिर्ला कॉलेज रोड, खडकपाडा, कल्याण (पश्चिम) - ४२१३०१.	०२-११-२०२६

दिनांक: २९.०७.२०२६
ठिकाण: महाराष्ट्र

सही/-, प्राधिकृत अधिकारी
मुथूट होमफिन (इंडिया) लि. करिता

डीएमआय हाऊसिंग फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: एमबीडी हाऊस, गुलाब भवन, २रा मजला, ६, बहादूर शाह जफर मार्ग, नवी दिल्ली-११०००२.
दूरध्वनी: +९१-०११-६६१०७१०७, ०११-६९२२३७००
वेबसाईट: www.dmihousingfinance.in फॅक्स: +९१-११-४१२०४०००
ई-मेल: vinay.sharma2@dmihousingfinance.in

खासगी करारद्वारे ई-लिलाव विक्री नोटीस (सरफेसी कायद्यांतर्गत)

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८(६) च्या तरतुदींसह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर सुरक्षित मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री नोटीस. याद्वारे सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदारांना खाली नमूद केलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे नोटीस देण्यात येते की, **डीएमआय हाऊसिंग फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड** (सुरक्षित धनको) कडे गहाण असलेल्या खाली नमूद केलेल्या मालमत्तांचा **प्रत्यक्ष ताबा** सिक्युरिटायझेशन ॲंड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲंड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३ (४) च्या तरतुदींनुसार **१३-०८-२०२५** रोजी आधीच घेण्यात आला आहे. ज्याअर्थी, सुरक्षित धनको त्यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत, सरफेसी कायद्याच्या कलम १३(४) अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून, खाली नमूद केलेली देणी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इत्यादींच्या वसुलीसाठी खाली नमूद केलेली मालमत्ता ई-लिलावासाठी ठेवतील. मालमत्ता **जसे आहे जेथे आहे*, "जसे आहे जे आहे* आणि कोणताही आधार नसलेल्या*** तत्त्वावर विकल्या जात आहेत आणि अशी विक्री कोणत्याही प्रकारच्या हमी आणि नुकसानभरपाईशिवाय आहे.
पाहणी दिनांक आणि वेळ: १३/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० ते दुपारी ०३:०० पर्यंत
ई-लिलावाची तारीख आणि वेळ: १७/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० ते दुपारी ०१:०० पर्यंत
बोली/ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख: १४/०८/२०२६ रोजी दुपारी ०४:०० वाजेपर्यंत

अ. क्र.	कर्जदार/सह-कर्जदार/ जामीनदाराचे नाव	थकीत रक्कम	सुरक्षित मालमत्तेचा तपशील	राखीव किंमत / इसारा रक्कम (ईएमडी - १०%)
१.	कर्जदाराचे नावः **किरण कृष्णा घाणेकर** सह-कर्जदारः **केदार कृष्णा घाणेकर, कृष्णा नामदेव घाणेकर, कृतिका कृष्णा घाणेकर** जामीनदाराचे नावः **प्रकाश डिंगणकर**	कर्ज खाते क्र. HFC0009725205 आणि अर्ज क्र. GG1200404 मध्ये, रु. ४,८३,१८६/- (रुपये चार लाख त्र्याऐंशी हजार एकशे शहाऐंशी मात्र) २९ एप्रिल २०२५ रोजी असल्याप्रमाणे.	मालमत्तेचा सर्व भाग आणि हिस्साः- फ्लॅट क्र. बी/३०५, ३रा मजला, 'श्री साईराज अपार्टमेंट' नावाच्या इमारतीत, जुना सर्वे क्र. ४०६, नवीन सर्वे क्र. १६१, हिस्सा क्र. २/२, क्षेत्रफळ २५९९० चौ. मीटर असलेल्या जमिनीवर बांधलेला, गाव - नारंगी, तालुका - वसई, जिल्हा - पालघर, वसईतील दुय्यम निबंधक क्षेत्रांतर्गत, महाराष्ट्र ४०१३०५ येथे स्थित."	राखीव किंमतः रु. २,५०,०००/- ईएमडीः रु. २५,०००/-

अटी आणि शर्ती:
१. खासगी करारद्वारे विक्री ही जसे आहे जेथे आहे* आणि जसे आहे जे आहे* या तत्त्वावर केली जाईल.
२. प्राधिकृत अधिकाऱ्याच्या सर्वोत्तम माहिती आणि समजुतीनुसार, कोणत्याही मालमत्तेवर कोणताही बोजा (encumbrance) नाही. तथापि, इच्छुक बोलीदारांनी आपली बोली सादर करण्यापूर्वी लिलावासाठी ठेवलेल्या मालमत्तेचे हक्क, बोजे आणि मालमत्तेवर परिणाम करणारे दावे/अधिकार/देणी याविषयी स्वतःची स्वतंत्र चौकशी करावी. ही ई-लिलाव जाहिरात बँकेची कोणतीही बांधिलकी किंवा प्रतिनिधित्व करत नाही आणि तसे मानले जाणार नाही. मालमत्ता बँकेला ज्ञात किंवा अज्ञात असलेल्या सर्व विद्यमान आणि भविष्यातील बोज्यांसह विकली जात आहे. प्राधिकृत अधिकारी/सुरक्षित धनको कोणत्याही तृतीय पक्षाचे दावे/अधिकार/देणी/थकीत वैधानिक देणी/कर इत्यादींसाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.
३. बोली सादर करण्यापूर्वी मालमत्ता आणि तिच्या वैशिष्ट्यांबद्दल प्रत्यक्ष पाहणी करून खात्री करून घेणे ही बोलीदारांची जबाबदारी असेल. लिलावासाठी ठेवलेल्या मालमत्तेच्या पाहणीसाठी इच्छुक बोलीदारांना प्रत्येक मालमत्तेच्या वर्णनासमोर नमूद केलेल्या ठिकाणी परवानगी दिली जाईल.
४. मालमत्ता राखीव किंमतीपेक्षा कमी किंमतीत विकल्या जाणार नाहीत. प्राधिकृत अधिकारी सर्वोच्च बोली स्वीकारण्यास बांधील नाहीत आणि कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व बोली स्वीकारण्याचा किंवा ई-लिलाव तहकूब/पुढे ढकलण्याचा/रद्द करण्याचा पूर्ण अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्याला आहे.
५. यशस्वी बोलीदाराची ईएमडी रक्कम विक्री मोबदल्याचा भाग म्हणून राखून ठेवली जाईल आणि अयशस्वी बोलीदारांची ईएमडी रक्कम लिलावाच्या तारखेपासून ७ कामकाजाच्या दिवसांत परत केली जाईल. ईएमडीवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही. यशस्वी बोलीदाराला विक्री किंमतीच्या २५% रक्कम (आधीच भरलेली ईएमडी समायोजित करून) तात्काळ म्हणजेच त्याच दिवशी किंवा पुढील कामकाजाच्या दिवसापेक्षा उशिरा नाही, आणि उर्वरित ७५% रक्कम विक्री निश्चित झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याच्या विवेकबुद्धीनुसार लेखी मान्य केलेल्या वाढीव कालावधीत जमा करावी लागेल.
६. इच्छुक पक्ष अधिक माहिती/स्पष्टीकरणासाठी आणि त्यांचे अर्ज सादर करण्यासाठी प्राधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात. प्राधिकृत अधिकाऱ्याचा तपशील खालीलप्रमाणे आहेः **श्री. विनय शर्मा, मोबाईल क्र. ८९५५८५०८३४ आणि ई-मेलः vinay.sharma2@dmihousingfinance.in, सोमवार ते शुक्रवार कामकाजाच्या वेळेत.**
७. खरेदीदाराला मालमत्तेच्या खरेदीच्या संदर्भातील सर्व मुद्रांक शुल्